ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) [Yr. 2016]

ISRJ Indian Streams Research Journal

# संत जनाबाईंची अभंगगाथा : एक विश्लेषण

**डॉ. माधव बसवंते**
सहाय्यक प्राध्यापक - मराठी , राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड ,
ता मुदखेड ,जि . नांदेड (महाराष्ट्र).

**सारांश**
महानुभाव संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यातील समाजशील जाणीवेतून संतकवयित्रींची मांदियाळी उदयाला आली. या मांदियाळीतील 'नामयाची दासी जनी' व 'संत वाटिकेतील जाईची वेल' अशी ज्या संतकवयित्रीची नाममुद्रा आहे ती संत कवयित्री म्हणजे संत जनाबाई होय. ती एक श्रेष्ठ साक्षात्कारी संत कवयित्री आहे. जनाबाईचे साधारणतः साडेतीनशेच्या आसपास अभंग उपलब्ध आहेत. जनाबाईंची अभंगगाथा हीच तिच्या जीवनचरित्राची कहाणी आहे. संत जनाबाईच्या अभंगगाथातून तिची विठ्ठलभक्ती, उपदेशवाणी, एक जबाबदार गृहिणी, भक्त, साधक



आणि सिद्ध अशा अनेक स्वरुपाची तिची व्यतिरेखा वाचकांसमोर उभी राहते. संत जनाबाईंनी अभंगाबरोबरच भारूड, काकड आरती, पदे, कुटे, आख्यानकाव्य अशा विविध प्रकारचे त्यांनी काव्यलेखन केलेले आहे. त्यांचे काव्य हे एक श्रेष्ठ तत्त्वकाव्य व भावमधूर काव्य म्हणावे लागते. 'स्त्रीजन्म म्हणवुनि न व्हावे उदास' यातून संत जनाबाईंनी तत्कालिन स्त्रीयांना आत्मविश्वासाची ऊर्जा दिली आहे. विठ्ठलभक्ती आणि नामदेवांची कृतज्ञता ही जनाबाईच्या अभंगातून सातत्याने जाणवते. यातून तिच्या निगर्वी व असामान्य व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते. अनेक सामाजिक अडसरांशी संघर्ष करीत व लढा देत संत जनाबाईंनी संतत्व प्राप्त केले आहे. यातच जनाबाईच्या महान कर्तृत्वाची उंची आहे.

**बीजसंज्ञा**
संत जनाबाईंचे चरित्र, नामदेवविषयक कृतज्ञता, विठ्ठलमय जनाबाई, संत ज्ञानेश्वरविषयक प्रेम भारूड, काकड आरती, जनाबाईंची उपदेशवाणी.

**प्रस्तावना**

संत जनाबाई ही सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आली. त्यानंतर ती आपल्या स्वयंभू कर्तृत्वाने असामान्य व्यक्तित्वाची उंची गाठली. इतर अनेक संत कवयित्रीपेक्षा संत जनाबाईचे आयुष्य भिन्न स्वरुपाचे होते. संत नामदेवाचे बोट धरुन ती आध्यात्मिक व साहित्यिक प्रवासात आली असली, तरी ती आपल्या साहित्यिक प्रवासात मात्र स्वतःची स्वतंत्र वाट शोधली. लेखन क्षेत्रात तिने आपले स्वतंत्र लौकीक निर्माण करीत एक नवा मानदंडही निर्माण केला. सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक आशयाची नवे बीजेही जनाबाईंनी आपल्या लेखनातून निष्ठेने रोवली आहेत. म्हणूनच जनाबाईचे बोल हे अनुभवाचे व अमृताचे वाटतात. अशा या तिच्या काव्यात भक्तीचे माधुर्य आणि योगाची खोली दिसून येते. स्वतःला लाभलेला अनाथपणा व स्त्रीत्व सोडून तिने कीर्तीचे सर्वोच्च शिखर गाठले आहे. संत जनाबाईच्या जीवनाचा हा संघर्षमय प्रवास अभ्यासकांना आश्चर्यमय वाटतो.

संत नामदेवापेक्षा साधारणतः किमान आठ-दहा वर्षांनी जनाबाई वयाने मोठी होती. संत जनाबाईंचे अभंग आणि तिच्याविषयी प्रचलित असलेल्या आख्यायिका यातूनच अभ्यासकांना संत जनाबाईंचा शोध घ्यावा लागतो. संत जनाबाईंची अनेक संतांची दखल घेतली असली, तरी संत चोखामेळा व संत सावता माळी यांचा अपवाद वगळता इतर बहुतेक संतांनी जनाबाईंची दखल घेतल्याचे दिसून येत नाही. संत जनाबाई ही अनेक संताकडून उपेक्षितच राहिली आहे. तरीही समाज मनावर संस्कार करण्याची जनाबाईंची तळमळ ही तिच्या अभंगातून अधोरेखित झाली आहे. ईश्वरभक्ती हे संत जनाबाईच्या अभंगाचे वैशिष्ट्ये असले तरी भक्ती, विठ्ठलमहिमा, संतमहिमा, नाममहिमा, उपदेश, कथात्मक रचना व पद रचना अशी विविधता त्यांच्या अभंगवाणीत आहे.

### संत जनाबाईंचे चरित्र

तेराव्या शतकातील संत जनाबाईंचे व्यक्तित्व भावमधूर व करुणामय आहे. मराठवाड्यातील गोदावरीच्या काठी असलेल्या गंगाखेड या गावी जनाबाईचा जन्म झाला. तिच्या वडिलाचे नाव 'दमा' व आईचे नाव 'करुंड' हे होते. तिचे आई-वडिल हे भागवद्‌भक्त होते. संतान प्राप्ती व्हावी यासाठी त्यांनी विठ्ठलाला नवस केला होता, या नवसामुळेच जनाबाईचा जन्म झाला, अशी त्यांची धारणा झाली होती. तसेच जनाबाईचे वडिल दमा यांना असा स्वप्न-दृष्टांत झाला की, 'तुझ्यापोटी तुझ्या कुळाचा उद्धार करणारी कन्या जन्माला येईल, तुझी ती कन्या दामाशेट्टीला अर्पण कर'. असा हा स्वप्न-दृष्टांत होता. या दृष्टांतानुसार जनाबाईच्या वडिलांनी जनाबाईला दामाशेट्टीच्या स्वाधीन केले आणि पुढे संत नामदेवाच्या जन्मानंतर दामाशेट्टीचा मृत्यू झाला अशी आख्यायिका सांगितली जाते. पुढे जनाबाई ही दामाशेट्टीच्या कुटुंबात लहानाची मोठी होती. जनाबाईला स्वतःचे घर नाही, माहेर तर आधीच गेले होते. तिला मान नाही, सन्मान नाही, प्रतिष्ठाही नाही. दामाशेट्टीच्या या घरात एक अनाथ दासी म्हणून ती अनेक अनुभव घेत जीवन जगत होती. संत जनाबाई ही दामाशेट्टीच्या परसदारात आणि विठ्ठल मंदिराच्या महाद्वारात वाढली. संत नामदेव हा याच दामाशेट्टीचा मुलगा आहे. याच नामदेवाला जनाबाईंनी त्याला बालपणापासून आपल्या अंगाखांद्यावर खेळविले. नामदेवाच्या सहवासात येण्यापूर्वीच जनाबाईंवर विठ्ठल भक्तीचे संस्कार झाले असले, तरी पुढे नामदेवामुळे ती अधिक विठ्ठलभक्तिमय झाली. म्हणूनच ती नामदेवापुढे कृतार्थ होते, पुढे नामदेव हेच जनाबाईचे आदर्श व गुरू होतात. नामदेवाच्या घरी चौदा माणसांचे कुटुंब होते. जनाबाई या सर्वांचेच काम करीत असत. नामदेवाच्या कुटुंबाचा परिचय करुन देतांना संत जनाबाई म्हणतात ः

नामदेवाचे घरी । चौदा जण स्मरता हरी
चौघे पुत्र चौघी सुना । नित्य स्मरती नारायणा
आणि माय बाप पाही । नामदेव राजाबाई
आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी
पंधरावी ती दासी जनी

संत नामदेवांच्या याच घरात जनाबाईने आपल्या आत्मबळावरच आत्मसुख प्राप्त करुन घेतले आणि तिने आपले सर्वस्व विठ्ठलाला अर्पण केले. विठ्ठलाशिवाय या जगात आपले कुणीच नाही आणि एक शुद्र म्हणूनही समाजाकडून होणारा तिचा सततचा अपमान हे तिचे शल्य होते. जनाबाईंनी आपली तक्रार फक्त विठ्ठलाकडेच केली आहे. संत नामदेवाच्या अभंगात जनाबाई उपेक्षित असल्या, तरी जनाबाई आपल्या अभंगात नामदेवाचा उल्लेख वारंवार करतात. संत जनाबाईंचे जीवन अनेक वेदनांनी, दुःखांनी, अपमानांनी आणि संघर्षांनी भरलेले आहे. अशा प्रचंड दुःखात वावरतांनाही जनाबाईची विठ्ठलभक्ती कमी झालेली नाही. संत पदाला पोहचण्यासाठी जनाबाईला संघर्ष करीत करीत मोठा लढा द्यावा लागला. संत नामदेव व संत जनाबाई या गुरुशिष्याचे निधन आषाढ, वद्य त्रयोदशी, शके १२७२ म्हणजेच ३ जुलै, १३५० रोजी झाले. संत नामदेव हे अंदाजे ऐंशी वर्षे जगले असावेत. तर जनाबाई नव्वद वर्षे जगली असावी अशी शक्यता आहे.

### नामदेवविषयक कृतज्ञता

संत नामदेवापेक्षा जनाबाई वयाने मोठी होती. जनाबाईंनी नामदेवाला आपल्या अंगाखांद्यावर खेळविले होते. नामदेव ईश्वरभक्त होते. बालपणापासूनच ते आपल्या संसाराविषयी उदासीन होते. जनाबाईंनी नामदेवाचे दासीपण स्वीकारुन ती आपल्या निष्ठेच्या बळावर विठ्ठलमय झाली. नामदेवाच्या घरी आश्रय मिळाल्यामुळे तिला तिच्या जीवनाच्या साफल्याची वाट सापडली. जनाबाईला कष्टमय जीवनात नामदेवांनी शेवटपर्यंत आधार दिला. नामदेव हेच जनाबाईच्या दुःखात समरस झाले होते. तिला आध्यात्मिक व पारमार्थिक लाभही नामदेवामुळेच झाला. नामदेवामुळेच जनाबाईला ज्ञानेश्वराचा श्रेष्ठ सहवास लाभला. मुक्ताईसारखी प्रेमळ मैत्रिण मिळाली व तिला इतर संतांचा परिचय झाल्यामुळे तिचे जीवन उजळून निघाले. जनाबाईंवर चोरीचा आरोप झाल्यानंतर ती विठ्ठलाकडे याचना करतांना केवळ नामदेवालाच सांभाळण्याची विनंती करते. जनाबाई आपल्या अभंगात म्हणतात ः

जन्मोजन्मो देई, हरी। दासी नाम्याची मी खरी
भोळा माझा नामदेव । त्यांसी तुम्ही सांभाळावे
हीच माझी विनवणी। मस्तक ठेविलें चरणी।।

यावरून जनाबाई आणि नामदेव यांचे नाते अलौकीक होते याची साक्ष पटते. आपले आणि नामदेवाचे साहचर्य हे युगांयुगांचे होते याचीही ती प्रमाणिकपणे कबुली देते. जनाबाई ही नामदेवाची दासी म्हणजेच त्यांची शिष्या होती. नामदेवाच्या कुटुंबापैकीच ती एक होती. त्यांच्या कुटुंबाशी ती एकरूप झाली होती. विठ्ठलभक्तीने भारावलेले नामदेवाचे घर होते, असाही ती उल्लेख करते. म्हणून ती नामदेवाच्या घराचा उल्लेख 'विठ्ठल प्रेमाचा कारखाना' अशा शब्दात करते. जनाबाई ही नामदेवाच्या वंशवृक्षाच्या साक्षीबरोबरच ती नामदेवाच्या विठ्ठलभक्तीची व कीर्तनाचीही साक्षीदार होती. म्हणूनच जनाबाईंनी नामदेवाचा वंशवृक्ष, कुटुंब, विठ्ठलभक्ती व कीर्तन हे आपल्या अभंगातून रेखाटन करुन नामदेवाचे चरित्र उपलब्ध करून दिले आहे. जनाबाई नामदेवाविषयी कृतज्ञ असली तरी ती कृतज्ञतेच्या ओझ्याखाली वाकलेली नाही. उलट ती नामदेवाच्या उपकाराचे अखंड आत्मभान ठेवीत पुढे संतत्वप्राप्तीच्या दिशेने चालत राहिली.

### विठ्ठलमय जनाबाई

विठ्ठल आणि जनाबाई यांच्यातील नातेसंबंध भक्त, परमेश्वर, मुलगी, आई अशा अनेक विविध रुपात दिसून येते. 'नाम विठ्ठलाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे।' अशा शब्दात ती आपला विठ्ठलाविषयीचा आग्रह व्यक्त करते. आपणास कुणीही नाही, आपण पोरके आणि एकाकी आहोत ही खंत व्यक्त करतांना जनाबाई म्हणतात ः

आई मेली बाप मेला। मज सांभाळी विठ्ठला।।
हरी रे मज कोणी नाही। माझी खात असे डोई ।।
विठ्ठल म्हणें रुक्मिणी। माझे जनीला नाही कोणी।।
हाती घेऊनी तेलफणी। केंस विंचरून घाल वेणी।।
वेणी घालुन दिधली गांठ । जनी म्हणे चोळ बा पाठ।।
जनी म्हणे बा गोपाळा। करी दुबळीचा सोहळा।।

या अभंगरचनेतून जनाबाईला विठ्ठलाशी असलेल्या शाश्वत नात्याचाच साक्षात्कार घडतांना दिसून येतो. विठ्ठल हाच आपला तारक आहे, अशी तिची आर्त धारणा आहे. जनाबाईच्या या आर्ततेमध्ये आणि व्याकुळतेमध्ये कठोर संतापही दिसून येतो. तेव्हा ती म्हणते -

अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।।
तुझी रांड रंडकी जाली। जन्मसावित्री चुडा ल्याली ।।
तुझें गेलें मढे। तुला पाहून काळ रडे।।
उभी राहूनी अंगणी। शिव्या देत दासी जनी।।

विनवणी करुनही विठ्ठल जेव्हा आपल्याकडे धाव घेत नाही अशा वेळी आपल्या कठोर शब्दातून विठ्ठलांविषयीचा ती संताप व्यक्त करते. विठ्ठल हा सर्वव्यापी व सामर्थ्यशाली असून नाम स्मरणामुळेच विठ्ठलाला आपण आपल्या हृदयात बंदिस्त करुन ठेवले असून आता विठ्ठलाला आपल्यापासून सुटका नाही, यासाठी त्या 'सोऽहं' या शब्दाच्या नामस्मरणाची युक्ती सांगतात. विठ्ठल आणि जनाबाई अर्थातच परमेश्वर आणि भक्त यांच्या नात्यातील गहिवर हा किती निखळ असतो याची साक्ष जनाबाईंच्या अभंगातून अधिक स्पष्ट होते. 'माझे जनीला नाही कोणी', 'दुबळीचा सोहळा', 'येग येग विठाबाई', 'जनी म्हणे माय आली', 'न्हाऊ घाली माझा सखा' यासारख्या अनेक अभंगरचनेतून विठ्ठलाच्या भक्तवत्सलाचे दर्शन होते. नवरदेवामुळेच वऱ्हाडाला पुरणपोळीचे जेवण मिळते. परिसामुळे लोखंडाचे सोन्यात रुपांतर होते, अगदी त्याचप्रमाणे केवळ विठ्ठलामुळेच आपल्या या जीवनाला अर्थ प्राप्त झाल्याचे जनाबाईंनी अत्यंत प्रामाणिकपणे स्पष्ट करतात.

### संत ज्ञानेश्वरविषयक प्रेम

विठ्ठलाप्रमाणेच जनाबाईच्या मनात संत ज्ञानेश्वरांविषयीही अपार प्रेम असल्याचे दिसते. पतिव्रतेच्या मनात आपल्या पतीशिवाय जसा दुसरा कोणताही विचार येत नाही, अगदी त्याचप्रमाणे जनाबाई ज्ञानेश्वरांचा उल्लेख 'तारू' अथा या शब्दात करतात. संत ज्ञानेश्वरांचा आध्यात्मिक अधिकार जनाबाईंनी ओळखला होता. म्हणूनच जनाबाईला संत ज्ञानेश्वर हे आपल्या आध्यात्मिक वाटेवरचा सखा वाटतो. विशेष म्हणजे संत ज्ञानेश्वर हा या जन्माचा मानसपुत्र व पुढील जन्मी आपल्या पाटी जन्माला यावेत अशी तीव्र इच्छा ती प्रकट करते. संत ज्ञानेश्वर म्हणजे जनाबाईला आपल्या मातृत्वाचा वर्षाव वाटतो. जनाबाई आपल्या अभंगात म्हणतात ङ

ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर।।
मरोनिया जावें। बा माझ्या पोटा यावे।।
ऐसें करी माझ्या भावा। सख्या माझा ज्ञानदेवा।।
जावे वोवाळुनी। जन्मजन्मी दासी जनी।।

यावरुन संत ज्ञानेश्वर व संत जनाबाई यांच्यातील भक्तीचा अद्‌भूत साक्षात्कार आपल्या लक्षात येतो. आपले चित्त, वित्त, गोत्र हे संत ज्ञानेश्वरच आहेत असे संत जनाबाई अत्यंत स्पष्टपणे सूचित करतात. जनाबाई ही संत ज्ञानेश्वरांच्या निर्गुणोपासनेच्या निरीक्षणाने भक्तिमार्गावरुन सरळ ज्ञानमार्गावर प्रवेश करते.

### भारूड

संत जनाबाईनी आपल्या भारुडातून समाजातील अनेक विकार-वासनेवर टीकास्त्र सोडले आहे. महाराष्ट्राचे लोकदैवत असणाऱ्या खंडेरायाकडे भारूडाच्या माध्यमातून नवस केला जातो. जनाबाईचे हे एक रूपकच आहे. अहंकारी प्रवृत्तीचा सासरा, सासू व नणंद यांच्या मरणाचा नवस करुन विकारमुक्त होण्याचा संदेश मिळतो. या विकारमुक्ततेमुळे आपणास खंडेरायाच्या चरणी निष्ठेने सेवा करता येईल. हा भाव यातून व्यक्त झाला आहे. संत जनाबाई आपल्या भारुडात म्हणतात ङ

खंडेराया तुज करिते नवसू।
मरुं दे रे सासू खंडेराया।।
सासू मेल्यावरी तुटेल आसरा।
मरू दे सासरा खंडेराया।।
सासरा मेलिया होईल आनंद।
मरू दे रे नणंद खंडेराया।
नणंद मरतां होईल मोकळी।।
गळां घालीन झोळी भंडाराची।।
जनी म्हणे खंडे अवघे मरू दे।
एकटी राहूं दे पायापाशी।।

या भारुडाच्या माध्यमातून संत जनाबाईंनी दुष्ट व अहंकारी माणसांच्या सहवासातून मुक्त होण्याचा विचार व्यक्त केला आहे. जनाबाईंनी इथे एका प्रापंचिक स्त्रीची प्रतिनिधीक भूमिका स्वीकारलेली आहे.

### काकड आरती

आपआपल्या आराध्य दैवतांना अनेक विशेषनांनी गुणगौरव करण्यासाठी आरती या काव्यरचनांचा प्रमुख हेतू असतो. आपल्या दैवताकडे आर्त हाक देण्यासाठी भक्त अशा आरतीचा आधार घेत असतो. देवाला जागे करण्यासाठी भल्या पहाटे भक्त आपल्या हातामध्ये 'काकडा' घेऊन जी आरती म्हटली जाते, त्या आरतीस 'काकड आरती' म्हणतात. संत जनाबाईंनी आपल्या काकड आरतीतून दैवतांचा गुणगौरव केलेला आहे. अनेक देवदेवता आपल्या आवडत्या देवाच्या दर्शनासाठी उत्सुकलेल्या असतात. तसेच पंढरीनगरीतील अनेक लेकीसुनाही आपल्या लाडक्या दैवताला ओवाळण्यासाठी आतूर झालेल्या आहेत. देवताविषयीची आर्तता पुढील अभंगरचनेतून अधिक स्पष्ट होते.

उठा पांडुरंगा प्रभातसमयी पातळा।
वैष्णवांचा मेळा गरुडपारीं घातला।।
वाळवंटापासूनी महाद्वारापर्यंत।
सुखरांची दाटी उभी जोडुनि हात।।

अशा काकड आरतीनेच दिनचर्येला प्रारंभ होत असतो. निद्रावस्थेतून दैवताला जागे करण्यासाठी काकड आरतीतून भक्त याचना करीत असतात. या काकड आरतीच्या स्वरात भक्ताचे कारुण्य दाटलेले असते. वाळवंटापासून ते महाराष्ट्रापर्यंत जनाबाईला सुखरांची दाटी झाल्याचे दिसते. यात शुक, सनक, नारद, तुंबरादी श्रेष्ठ विष्णुभक्तही तिला दिसतात. अनेक अप्सरा विविध नृत्य करुन देवाला जागृत करण्याचा प्रयत्न करीत असतात. संत नामदेव हाही या कीर्तनात तल्लीन झ ाला असून या नामदेवाच्या मागे जनाबाई डोळे मिटून उभी आहे. अशा आशयाचे जनाबाईंनी रेखाटलेले हे क्षणचित्र आशयपूर्ण आहे.

## जनाबाईंची उपदेशवाणी

संत जनाबाईने प्रामुख्याने भक्तीचा उपदेश केला आहे. प्रत्येकांनी ईश्वराची भक्ती करावी. भक्तीचे दार हे सर्वांसाठी खुले असून जात, धर्म, वर्ण यांची कोणतीही आडकाठी यात येत नाही. संसारात राहूनही भक्ती करता येते. मानवी जीवन सुखी करण्यासाठी दया, क्षमा, शांती, शुद्ध चारित्र्य, वैराग्य या सद्‌गुणांचा जनाबाईंनी सातत्याने उपदेश केलेला आहे. ती सर्व संतांना वंदन करते. देव व संत एकरुप असतात. दांभिक माणसांच्या प्रवृत्तीवर टीका करतांना व वैष्णवचे महत्त्व स्पष्ट करतांना जनाबाई म्हणतात ङ

वैष्णव तो एक इतर ती सोंगे।
ठसे देउनी अंगे चितारिती।।
जिचे योनि जन्मला तिसी दंडू लागला।
तीर्थरूप केला देशधडी।।
नाइकोनी ब्रम्हज्ञान जो का दुराचारी।
अखंड द्वेष करी सज्जनांचा।।

वैष्णव ही एक व्यापक जीवनदृष्टी असून संत चोखामेळा महार हा जनाबाईंना खरा वैष्णव वाटतो. याउलट आपल्या मातेला छळणारी, पित्याला देशोधडीला लावणारे, संतांचा व सज्जनांचा द्वेष करणारे व आपल्या अंगावर विष्णुमुद्रा घेऊन फिरणारे श्रेष्ठ असले आणि ते आपल्या कर्माने चांडाळ असणारे वैष्णव असू शकत नाहीत, अशा निर्वाणीच्या भाषेत जनाबाईंनी स्पष्ट केले आहे.

संतसंगतीचा उपदेश करतांना चंदनाच्या संगतीत आल्यानेही इतर झाडांनाही सुगंध प्राप्त होतो आणि साधी लाकडेही गंधाच्या रूपाने देवाच्या माथ्यावर विराजमान होतात. अगदी त्याचप्रमाणे संत संगतीने सर्वसामान्य माणूसही संतत्व प्राप्त करू शकतो. म्हणूनच जनाबाई संतांना वंदन करीत संत संगतीचा उपदेश केलेला आहे. तसेच वारकरी संतांनी स्वीकारलेल्या नाममाहात्म्य भक्तीचा पुरस्कार करीत जनाबाईंनी 'नाम विठोबाचे घ्यावे। मग पाऊल टाकावे।।' आपल्या मुखाने विठ्ठलाचा जयघोष करावा, सतत विठोबाचे नाव उच्चारात रहावे असा उपदेश करीत 'रामकृष्ण हरि गोविंद' या मंत्राचाही आपल्या मनास छंद लावण्यास त्यांनी सूचित केले आहे. वाईट विषयाच्या संगतीने अनेक अधोगतीला गेले आहेत, हा उपदेश करतांना जनाबाई म्हणतात ङ

पतंग सुखावला भारी। उडी घाली दीपावरी।।
परि तो देहांती मुकला। दोंन्ही पदार्थी नाडिला।।
विषयाचे संगती। बहू गेले अधोगती।।
ऐसे विषयाने भुलविलं। जनी म्हणे वायां गेले।।

संत जनाबाईंनी पंढरीनगरीचे माहात्म्यही स्पष्ट केले आहे. ही पंढरीनगरीची वाट विवेकाची पेठ आहे. ही पंढरी सर्व तीर्थांचे माहेर आहे. म्हणून सर्व लोकांनी पंढरीला जाण्याचा ती आग्रह धरते. विठ्ठलाचे दर्शन घेऊ, हरिनामाचा गजर करू, चंद्रभागेमध्ये स्नान करु व विठ्ठलाला डोळे भरून पाहून आपण आपला देहभान विसरून जाऊ. असा जनाबाईंनी सर्वांना निश्चयाचा उपदेश केला आहे. फक्त भक्तिनेच सर्व कुळातील आणि जाती धर्मातील स्त्री - पुरुषांचा उद्धार होतो, म्हणून 'स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास' अथा स्पष्ट शब्दात जनाबाईंनी स्त्रियांना भक्तीचा मार्ग सांगितला आहे.

## निष्कर्ष

- एक सर्वसामान्य स्त्री ही दासीपणाचे जीवन जगत असतांना विठ्ठलभक्तिने आपल्या आध्यात्माच्या सामर्थ्याने कर्तृत्वाची व संत पदाची उंची गाठू शकते याचा आदर्श संत जनाबाईंनी निर्माण केला आहे.
- संत नामदेवाच्या कुटुंबातील जनाबाईचे स्थान हे त्यांच्या घराच्या अंगणात किंवा परसात आहे. शारीरिक श्रमाची कामे हीच तिच्या अनुभवविश्वाच्या सीमारेषा आहेत.
- संत जनाबाईंनी आपल्या निखळ व निरपेक्ष भक्तीच्या सामर्थ्यावर विठ्ठलाला आपलसं केले आहे.
- विठ्ठल हा आपल्या सर्व भक्तांना सांभाळून घेतो, यासाठी जनाबाई घार, तसेच द्रोपदी, गोरा कुंभार, कबीर यांच्या चारित्राचे अत्यंत मार्मीकपणे दाखले देतात.
- संत जनाबाई ही संत नामदेवांच्या वंशवृक्षाची जशी साक्षीदार होती, तशीच ती त्यांच्या कीर्तनभक्तिचीही साक्षीदार होती. म्हणून कीर्तनकार नामदेवांचे तिने रेखाटलेले चित्र अत्यंत वस्तुनिष्ठ आहे, याची साक्ष पटते.
- संत जनाबाईला समकालीन भगवद्‌भक्ताविषयी प्रचंड जिव्हाळा असून संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत गोरोबा यासारख्या अनेक संताचे तिने आपल्या अभंगातून व्यक्तिचित्रण रेखाटले आहे.

- जनाबाईंनी आपल्या अभंगरचनेबरोबरच भारूड, पदे, आख्यानकाव्य यासारखे विविध काव्यप्रकार समर्थपणे हाताळले आहेत.
- जनाबाईंनी भक्ती, संतसंगतीचे महत्त्व, खरा वैष्णव, नाममाहात्म्य, विठ्ठलमाहात्म्य, पंढरीमाहात्म्य आणि स्त्रीजन्म यासारख्या अनेक विषयावरील त्यांची उपदेशवाणी वस्तुनिष्ठ व विवेकनिष्ठ आहे.
- जनाबाईवर चोरीचा आरोप करण्यात आला असला तरी मात्र तिच्यावर देव बाटविल्याचा आरोप कुणीही केलेला नाही.

**संदर्भ**

१) डॉ. सुहासिनी इर्लेकर, जनाबाईंचे निवडक अभंग, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.
२) डॉ. इनामदार हे.वि., संत नामदेव.
३) डॉ. केतकर प्रकाश, संतकविता : एक दृष्टिकोन.
४) आजगावकर ज.र. - महाराष्ट्र संत कवयित्री.
५) ढेरे रा.चिं. - नामयाची जनी.



**डॉ. माधव बसवंते**
**सहाय्यक प्राध्यापक - मराठी , राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड , ता मुदखेड ,जि . नांदेड (महाराष्ट्र).**